**※ आपण अशा प्रकारे मदत करु शकता :-**

१) एका मुलाचे वार्षिक पालकत्व स्विकारता येईल. २) आपले वाढदिवस, विवाहसोहळा, वास्तुशांती, स्मृती दिन, लग्नाचा वाढदिवस, इतर शुभकार्य प्रसंगी अन्नदान किंवा आर्थिक मदत करु शकता तसेच दिवाळी, ईद, नाताळ, महामानवांची जयंती, पुण्यतिथी प्रसंगी संस्थेला देणगी देऊन सहभागी होऊ शकता. ३) दिवंगत व्यक्तींच्या स्मृतीप्रित्यर्थ बांधकामास आर्थिक व वस्तुरुपी मदत करु शकता ४) आपले वैयक्तिक कौशल्य अथवा छंद जसे नृत्य, गायन, अभिनय, वाद्यवादन, कथाकथन, याचा मुलासमवेत आस्वाद घेऊ शकता. ५) वस्तुरुपाने तांदुळ, गहु, ज्वारी, बाजरी, कडधान्य, आवश्यक पालेभाज्या, किराणा यासाठी मदत करु शकता. ६) शालेय साहित्य, गणवेश, खेळाचे साहित्य, अवांतर पुस्तके, कला कौशल्य साहित्य, सायकल, संगणक, फर्निचर इ. ७) एका दिवसाचे अन्नदान खर्च रु. ४५००/- ८) एका बालकाचे मासिक पालकत्व रु. ३६००/- ९) एका बालकाचे वार्षिक पालकत्व रु. ४३२००/- १०) ऐच्छिक देणगी आणि आपला अनमोल वेळ देऊन या जडणघडणीच्या कार्यात योगदान देऊ शकता. त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था, कंपनी, व्यापारी, उद्योजक, सामाजीक कार्यकर्ते यांनी सढळ हाताने आर्थिक तसेच वस्तु स्वरुपात मदत करावी असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे.

※ बँकेचे नांव :- सेंट्रल बँक ऑफ इंडिया ※ शाखा :- जामखेड
※ खात्याचे नाव :- ग्रामिण विकास केंद्र संचलित, निवारा बालगृह
※ बँकेचे खाते क्र. :- 3454359018 ※ IFSC Code :- CBIN0281004
※ MICR Code :- 413016293
※ संस्थेचे सर्टिफिकेट :- 1) 80G, 2) 12A, 3) FCRA

**Registration Details :-**
a) Societies Registration Act, 1860 : MAHA-3323/Dt. 29/03/1995/Ahmednagar.
b) Bombay Public Trust Act, 1950 : F-3147/Dt. 31/05/1995/ Ahmednagar.
c) 80G Act of 1961: AAATG8457BF20210
d) 12AA (I) (b) (i) No. AAATG8457BE20212
e) PAN Number: AAA TG 8457 B-2004
f) CSR 1 : CSR00016262

10294880@cbin

**मदतीसाठी संपर्क**
१) बाळू ओहोळ (संचालक) मो. ९८९०३१३१११
२) सचिन भिंगारदिवे (समन्वयक) मो. ९६२३६८६२५२
३) वैजीनाथ केसकर (अधिक्षक) मो. ९५८८६०२६६२
४) संतोष चव्हाण (व्यवस्थापक) मो. ७७९८४५३६११

**※ एकल महिला व निराधार बालके उन्नती कार्यक्रम (माय-लेकरू प्रकल्प)** माय-लेकरू प्रकल्प हा ग्रामीण विकास केंद्र व टोल ग्रुप पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत- जामखेड तालुक्यातील ५३ गावामध्ये काम चालते. यामध्ये एकल महिला व त्यांच्या मुलांसोबत काम करण्यात येते. एकल महिलांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे,त्यांच्या मुलांना बालसंगोपन योजनेचा लाभ मिळवून देणे. विविध अडीचणीमध्ये मार्गदर्शन करणे, न्यायालयीन प्रक्रियेत अल्प फि मध्ये वकील मिळवून देणे. पोलीस यंत्रणा तसेच सर्वच शासकीय कार्यालयाच्या प्रक्रियेमध्ये मदत करणे, त्यांचे संविधानिक हक्क व अधिकाराची जाणीव होणेसाठी शिबिरे घेणे असे विविध उपक्रम राबविले जातात. सद्यस्थितीमध्ये कर्जत-जामखेड जि.अहिल्यानगर या भागात ३९८४ एकल महिलांसोबत व १३६१ मुलांसोबत माय-लेकरू प्रकल्पाच्या माध्यमातून काम चालू आहे. आत्तापर्यंत प्रकल्पाच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना - ५९४, जातीचे दाखले- ४८९, आधार कार्ड- १७३, रेशनकार्ड- १२८, बालसंगोपन योजना - ४३८, ई- श्रम कार्ड- ८४६, शालेय साहित्य वाटप- ४३० मुलांना, शालेय स्पर्धा- ४ समुपदेशन / मार्गदर्शन- १६९४, कौटुंबिक हिंसाचार केस- ८३, पोलीस स्टेशन केस- ३८, न्यायालयीन प्रक्रियेत मदत- १६९, आधार कार्ड- ४९७ काढून देण्याचे काम करण्यात आले आहे.



मायलेकरु प्रकल्पांतर्गत निराधार महिलांना शिवण कामाचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा उपक्रम

**※ (GLODP) ग्रासरूट लिडरशिप, ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट प्रोग्रॅम :-**
या प्रोग्रॅम मार्फत कोरो इंडिया संघटनेकडून तळागाळातील नेतृत्व पुढे यावे त्यांच्या नेतृत्वाचा विकास व्हावा, त्यांनी अनेक संविधानीक मुल्यांच्या आधारावर कार्यकर्ते घडावेत हा उद्देश समोर ठेवून GVK ला फेलोशीप दिल्या जातात. यामुळे कधीही घराबाहेर न पडलेल्या महिलांना प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविले जाते. त्यांचे नेतृत्व विकास करुन त्यांनी निवडलेल्या गावात वंचीत घटकांना न्याय मिळवून देण्याचे विधायक कार्य केले जाते.

**※ संस्थेच्या भविष्यकालीन योजना :-** सेंद्रिय शेती, एकल महिलासाठी रोजगार, स्वयंम रोजगार निर्मिती व कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण, भटके विमुक्त समाजातील गरिब, हुशार, होतकरु विद्यार्थ्यांना फेलोशिप देणे. भटके विमुक्त ज्ञान, अभ्यास व संशोधन केंद्राची उभारणी, भटके विमुक्त समाजातील तळागळातील कार्यकर्त्यांसाठी ग्रामीण विकास केंद्राच्या माध्यमातुन उस्मानाबाद, अहिल्यानगर, बीड, सोलापुर, पुणे. जिल्ह्यात फेलोशीप कार्यक्रम राबविण्यात येणार तसेच महिलांच्या मालमत्तेचे अधिकार या विषयावर कार्यक्रमांची आखणी करण्यात येणार आहे.




भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती महाराष्ट्र राज्य आयोजित सोलापूर ते मुंबई भटके विमुक्त संवाद यात्रेचे अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालया-समोर आंदोलन

बी.आर. पब्लिसिटी ॲण्ड इव्हेंट मॅनेजमेंट / ९८२२८४४०००

।। निराधारांची सेवा हीच खरी सेवा ।।

# ग्रामीण विकास केंद्र

संचलीत

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
नोंदणी क्र. - महा. ३३२३/अ.नगर, एफ.३१४७/अ.नगर.
विना अनुदान तत्वावरील

# निवारा बालगृह

**Reg. No. : AHN-19/CH/2020/019**

अनाथ, निराधार, वंचित, अन्याय, अत्याचार ग्रस्त, दलित, आदीवासी, भटके विमुक्त, उसतोड कामगार, वीट भट्टी मजुर, लोककलावंतांच्या मुलामुलींचे वसतीगृह











※ सचिव :- उमा अरुण जाधव / मो. ९६२३२५४६७६
समताभुमी, मोहाफाटा, बीड रोड, जामखेड, जि.अहिल्यानगर-४१३२०१

※ मुख्य कार्यालय - कुंभारतळे, जामखेड, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर-४१३२०१
☎ : (०२४२१) २२२२६६,
※ पुणे कार्यालय - प्लॉट नं. ५५८/२/१०, ओटा नं. ३०, फ्लॅट नं. ५, वेदिका बेकरी समोर, दुसरा मजला, म्हात्रे पुलाजवळ, दत्तवाडी, पुणे-३०
※ Email :- gvkjamkhed@gmail.com ※ website :- www.gvkjamkhed.org

Follow us :-

जामखेड ते बीड रस्त्यावर जामखेड पासुन ६ कि.मी. अंतरावर मोहा फाटा येथे, सौताडा घाटाच्या पायथ्याशी

**ग्रामीण विकास केंद्र** या संस्थेच्या माध्यमातुन गेल्या २९ वर्षापासुन आदिवासी, दलित, भटके विमुक्त, विधवा, परित्यक्ता, एकल महिला तसेच बालकांसाठी काम हाती घेतले आहे. संस्थेच्या स्थापनेपासुन आजतागायत संस्थेने यासाठी शैक्षणिक, जाणीव जागृती, नेतृत्वविकास अभियानासारखे अनेक प्रकारचे उपक्रम राबविले आहेत.

जामखेड, कर्जत व श्रीगोंदा तालुक्यातील तसेच पुणे जिल्ह्यातील आदीवासी, दलित व भटक्या विमुक्तांच्या वस्त्या निवडुन तेथील मुले व त्यांच्या पालकांसोबत शिक्षणावर काम केले. व तेथील सर्व मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणली. त्याभागात शासनाच्या सहकार्याने बालवाड्या व अंगणवाड्या सुरु करुन शिक्षणाबाबत असलेली उदासीनता दुर केली.

ग्रामीण विकास केंद्र, जामखेड या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने २६ जून २०१५ रोजी राजर्षी शाहू महाराजाच्या जयंतीदिनी निवारा बालगृहाची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या कार्यालयामागे बांधलेल्या हॉलमध्ये पहिल्या वर्षी ८ मुले निवासी शिक्षण घेत होती. दुसऱ्या वर्षी १७ व तिसऱ्या वर्षी २९ अशा चढत्या क्रमाने विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली. त्यामुळे येथील जागा व उपलब्ध सुविधा विद्यार्थ्यांना अपुऱ्या पडु लागल्या. त्यामुळे सन २०१८ मध्ये जामखेड पासुन ६ कि.मी. अंतरावर सौताडा घाटाच्या पायथ्याशी, मोहा फाटा येथे, निसर्गरम्य वातावरणात २ एकर जागेवर लोकसहभागातून **निवारा बालगृहाच्या** सुसज्ज इमारतीचे बांधकाम केले. तेथे सध्या ८५ मुले व मुली निवासी शिक्षण घेत आहेत. त्यातील काही मुले जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहा तर काही मुले गावातील माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत आहेत.

जामखेड, बीड, नगर, पुणे येथील दानशूर व्यक्ती, संस्था, कंपनी व विविध फर्मकडून दगड, वाळू, विटा, सिमेंट, स्टील इत्यादी वस्तू व रोख स्वरुपातील देणगीतून २ वर्षात निवारा बालगृहाची इमारत उभी राहिली.

२०१८ मध्ये निवारा बालगृह, मोहा फाटा येथील नविन वास्तुत स्थलांतरीत झाले. तिथे मुलांना २ वेळचे जेवण, नाश्ता, गणवेश, शालेय साहित्य, क्रीडा साहित्य, लोकवर्गणी व देणगीद्वारे मिळविण्यासाठी स्वयंसेवकांवर जबाबदारी सोपविण्यात आली. त्यातून हा खर्च भागवला जाऊ लागला. तसेच शेतकरी, व्यापारी, दुकानदार यांच्याकडून वसतीगृहातील मुलामुलींसाठी अन्नधान्य, किराणा, भाजीपाला, फळे मदतीच्या स्वरुपात निवारा बालगृहाचे



**निवारा बालगृहातील अनाथ मुलांना अंघोळ घालतांना संस्थापक अध्यक्ष ॲड.डॉ. अरुण जाधव**

कार्यकर्ते गोळा करतात. कोरोना महामारी व लॉकडाऊनच्या काळातही संस्थेने खंबीरपणे या मुलांचा सांभाळ केला.

इमारत बांधकामानंतरच्या २ वर्षात मुलांसाठी क्रिडांगण, भाजीपाला लागवड, वृक्षलागवड, सुशोभिकरण व अभ्यासवर्ग सुरु करण्यात आले. शालेय शिक्षणा बरोबरच या मुलांना खऱ्या अर्थाने जिवन जगता यावे म्हणून चित्रकला, रांगोळी, नृत्य, गायन, अभिनय, वत्कृत्व, कार्यानुभव इत्यादी विषय शिकविले जातात. हळूहळू मुलेमुली या गोष्टी आत्मसात करु लागले आहेत. निवारा बालगृहातील मुलामुलींच्या सुप्त-कलागुणांना वाव मिळावा म्हणून येथे विविध स्पर्धा व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच वर्षातून एकदा 'निवारा महोत्सवाचे' आयोजन केले जाते.



**निवारा महोत्सवात नृत्य करतांना विद्यार्थी**

**※ निवारा बालगृहाची वैशिष्ट्ये :-**

※ सुसज्ञ इमारत ※ स्वतंत्र अभ्यासिका, ※ शांत, निसर्गरम्य वातावरण, ※ आरोग्य सुविधा तसेच पौष्टीक आहार, ※ शुध्द पिण्याचे पाणी तसेच विजेची सुविधा, ※ मुलांचा सर्वांगिण विकास व उत्तम शिक्षण, ※ समान संधी, ※ अचुक मार्गदर्शन, ※ सुरक्षिततेची हमी. ※ प्रशस्त सभागृह, प्रशिक्षण हॉल, सुसज्ज ग्रंथालय, साऊंड सिस्टिम, सि.सि.टी.व्ही. कॅमेरे, पथदिवे, मुलांसाठी खेळणी, कॉम्प्युटर लॅब, स्क्रीन प्रोजेक्टर, सोलर वॉटर हिटर, स्टोअर रुम.

**※ बायोगॅस प्लॅन्ट :-** निवारा बालगृहामध्ये प्रविण मसाले प्रायोजित बायोगॅस मध्ये जनावरांच्या शेणापासुन तयार झालेल्या गॅसवर स्वयंपाक केला जातो.

**※ सुसज्य इमारत :-** निवारा बालगृहाच्या इमारतीमध्ये स्वतंत्र स्वयंपाक गृह, विद्यार्थिनी निवास, विद्यार्थी निवास, अधिक्षक निवास, शौचालय व स्नानगृह यांचा समावेष आहे. निवारा बालगृहामध्ये नव्याने स्वतंत्र कार्यालय, विश्रामगृह व प्रशिक्षण हॉलचे बांधकाम पुर्ण करण्यात आले आहे.

**※ शैक्षणिक उपक्रम :-** मनोरंजनातून शिक्षण व प्रबोधन हा संस्थेचा उदात्त हेतू आहे. त्यामुळे निवारा बालगृहातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारे पाढे, अंकलिपी, चंद्र, तारे, ग्रह, अवकाशयान, खगोलशास्त्रविषयी प्राथमिक माहिती, भारतीय राज्य घटनेची उद्देशिका, राष्ट्रगीत, प्रार्थना, प्रतिज्ञा, जोडशब्द, ए.बी.सी.डी., मराठी व इंग्रजी महिने, सण, वार, राष्ट्रीय उत्सव, याबद्दल रंगीत चित्र स्वरुपातील माहिती अत्यंत कल्पक पध्दतीने निवारा बालगृहातील मुलांच्या निवासी हॉलमध्ये चित्रबध्द करण्यात आली आहे.

**※ कला कौशल्य :-** व्यवसायभिमुख शिक्षण - निवारा बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमा बरोबरच, चित्रकला, रांगोळी, पेटींग, वक्तृत्व, कबड्डी, खो-खो, विविध खेळ, व्यवहार ज्ञान, कॉम्प्युटर टायपिंग असे रोजगारभिमुख शिक्षण देण्याचा संस्थेचा उपक्रम सुरु आहे.

**※ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना :-** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग व ग्रामीण विकास केंद्राच्या माध्यमातुन बाल संगोपन योजनेअंतर्गत अनाथ, निराधार, बेघर, शारिरीक व्यंग किंवा इतर आपत्ती असलेल्या बालकांसाठी मासिक अनुदान दिले जाते.

**※ आईचे घर :-** ग्रामीण विकास केंद्राच्या माध्यमातून आईचे घर प्रकल्प, निवारा बालगृह येथे उभा करण्यात आला आहे. इथे राहणाऱ्या महिला या कुमारी माता, प्रौढकुमारी, विधवा, घटस्फोटीत, अविवाहित, पीडित महिलांसाठी आहे. यातून महिलांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होऊन प्रशिक्षित होऊन महिला सक्षम व स्वावलंबी व्हाव्यात हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

**※ महिला सक्षमीकरण :-** सावित्री महिला समस्या नोंद सल्ला केंद्र कोरो व ग्रामीण विकास केंद्र यांच्या संयुक्त सहकार्याने २८ गावात जवळपास २००० च्या पुढे कौटुंबिक कलह सोडविण्याचे काम करण्यात आले. श्रीगोंदा, जामखेड, कर्जत या तीन तालुक्यात महिला सक्षमीकरण केंद्र सुरु आहे.

**※ समता फेलोशीप :-** समता फेलोशीपच्या माध्यमातुन ग्रामीण विकास केंद्राच्या वतीने कर्जत, जामखेड व श्रीगोंदा या तालुक्यातील आदीवासी, भटके विमुक्त समाजामध्ये विविध उपक्रमांद्वारे भारतीय संविधानाच्या बद्दल जनजागृती करण्याचे काम समता फेलो करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना चांगले यश मिळत आहे. त्यामुळे भारतीय संविधानाचे आपल्या दैनंदिन जीवनामध्ये काय महत्व आहे याची प्रचिती नागरीकांना पावलो पावली येत आहे.



**संविधान दिंडीमध्ये सहभागी झालेले समत फेलो व मान्यवर**

**※ पारधी विकास आराखडा :-** पारधी विकास आराखडा योजनेची अंमलबजावणी व्हावी म्हणुन शासनाकडे सतत पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे काही पारधी कुटुंबांना आदीवासी विभागाकडून शेती मिळाली आहे व त्यांची मुले शासकिय वसतीगृहात राहुन सध्या शिक्षण घेत आहेत, संस्थेच्या माध्यमातून घरकुल मिळालीत.



**पारधी विकास कृती समिती तर्फे आदिवासी भटके विमुक्तांच्या पालावर राजर्षि शाहू महाराजांची जयंती साजरी करताना**